# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**No.CGRF / AZ/ U / 143 / 2008 / 64/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer (O&M)**
**Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Mrs. Suvarna S.Raka
187, Goodfellows Residency, Samarthnagar , Aurangabad.
(Consumer No.490010929684)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Mrs. Suvarna S. Raka, 187, Goodfellows Residency, Samarthnagar , Aurangabad.

The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of faulty bill.

You are requested to submit your reply on the grievance of the consumer at the time of hearing .

**The hearing in this matter is kept on 21/10/2008 at 13=00 hrs.**

Member/Secretary,
CGRF(AZ) MSEDCL,Aurangabad.

**Encl As above**.

Copy to :
Mrs. Suvarna S.Raka
187, Goodfellows Residency,
Samarthnagar , Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४३/२००८/६४**

**तक्रार दाखल दिनांक ;- १४/१०/२००८**
**निकाल दिनांक ;- १४/११/२००८**

**सौ. सुवर्णा सुनील राका,**
**१८७,गुडफेलोज रेसीडेंसी,समर्थनगर**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९०००१०९२९६८४) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडिया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १५/१०/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २१/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार ह्यानी ते राहत असलेल्या गुडफेलोज रेसीडेन्सी समर्थनगर येथील सदनिकेसाठी महाविरतण कंपनी कडुन थ्री फेज वीज पुरवठा घेतला आहे. महावितरण कंपनीतर्फे २९/०८/२००७ ते २९/०९/२००७ या काळात ७१० युनिट वीज वापराचे सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आले याबाबत संबंधित अधिका-याकडे तक्रार केली असता त्यांना बिल दुरूस्त करून न देता पार्टपेमेट भरण्याचे सांगण्यात आले. ०८/११/२००७ रोजी महावितरण कंपनीतर्फे त्यांच्या मीटरची स्थळ पाहणी करण्यात आली च्यावेळी मिटरवरील रिडींग ३६९८३ अशी होती.अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दिनांक २८/०७/२००७ ते २९/०८/२००७ या कालावधीत मीटरवर ४७८४ मीटरवर अशी रिडींग होती.मीटरवर अचानक वाढलेल्या रिडींग बाबत त्यांनी उपकार्यकारी अभियंता पॉवर हाऊस यांच्याशी विचारणा केल्यावर सदरील मीटर जम्पं होत असावे व त्यांची चाचणी करणे जरूरी असल्याचे त्यांना सांगण्यात आले. दिनांक १३/११/२००७ रोजी त्यांचे मीटर चाचणीसाठी काढण्यात आले त्यावेळी ते ३९२२६ रिडींग दर्शवित होते.अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दिनांक ०८/११/२००७ ते १३/११/२००७ या काळात मीटरवर (३९२२६-३६९८३)२२४३ युनिट वीज वापराची नोंद झालेली आहे. सदरील मीटरची महावितरण कपनीतर्फे चाचणी करण्यात आली व मीटर बरोबर असल्याचे त्यांना सांगण्यात आले. अर्जदाराने मीटरवर दाखविण्यात येत

असलेला वीज  वापर चुकीचा असल्याचे सांगत मीटर पुर्नतपासणी करण्याची मागणी केली. पण महाविरतण कंपनीने त्याची दखल न घेता त्यांना सतत पार्टपेमेंट करण्याचे सांगितले ज्याचा भरणा त्यांनी केलेला आहे. महावितरण कंपनीने वीज बिल दुरूस्त करून दिले नसल्यामुळे अर्जदाराने मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक १५/१०/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री अजय पाटील उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपल्या  जवाबासोबत मीटर चाचणी अहवाल तसेच मुख्य अभियंता यांना बिल रिव्हीजनसाठी पाठविलेला प्रस्ताव मंचात दाखल केला. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर  नोडल अधिकारी यांना अर्जदाराचे पुर्ण सि.पी.एल. तसेच चाचणीसाठी पाठविण्यात आलेले वीज मीटर मंचात पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याबाबत आदेश दिला. तसेच अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यत त्यांचा वीज पुरवठा खंडीत करू नये अशा आदेश ही महावितरण कंपनीस दिला. या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०४/११/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

३) ०४/११/२००८ रोजी अर्जदारा प्रतिनिधी व नोडल अधिकारी सुनावणीस उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी चाचणी करण्यात आलेले जुने मीटर सापडत नसल्याचे सांगत मीटर बदली अहवाल व सी.पी.एल. मंचात दाखल केले. महावितरण कंपनीच्या संबंधीत उपकार्यकारी अभियंता यांनी मुख्य अभियंता यांना सादर केलेला वीज बिल दुरूस्ती प्रस्तावाचे विश्लेशन  करण्याचे नोडल अधिकारी यांना सांगण्यात आले. नोडल अधिकारी यांनी ते पुढील सुनावणीच्यावेळी करण्याचे मान्य केले. मंचाने अर्जदाराचा स्थळपाहणी अहवाल दाखल करण्याचे आदेश देवुन पुढील सुनावणीची तारीख ११/११/२००८ रोजी निश्चीत केली.

४) मंचाचे अध्यक्ष व तसेच सदस्य सचिव यांनी ते उपलब्ध नसल्याचे कळविल्यामुळे दिनांक ११/११/२००८ रोजीची सुनावणी दिनांक १४/११/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक १४/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी दिनांक ०६/११/२००८ रोजी केलेला स्थळपाहणी अहवाल मंचात दाखल केला तसेच उपकार्यकारी अभियंता यांनी मुख्य अभियंता यांच्याकडे सादर केलेचा बिल रिव्हीजन प्रस्तावाचे विश्लेषण केले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) अर्जदार व महावितरण कपनी तर्फे मंचात दाखल कलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी थ्री फेज वीज पुरवठा घेतलेला असुन त्यांच्या जागी लावण्यात आलेल्या मीटर चा क्रमांक ६०७८९ असा आहे. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास ऑगस्ट २००७ पर्यत मीटरवरील नोंदीप्रमाणे बिल आकारण्यात येत असल्याचे दिसुन येते. सप्टेबर २००७ ते नोव्हेबर २००७ या तीन महीन्याच्या काळात मागील रिडींग ४७४८ व चालु रिडींग ४७४८ अशी दाखवुन अर्जदारास ७१० युनिट वीज वापराचे सरासरीवर आधारीत बिल आकारणी करण्यात आल्याचे आढळुन येते. डिसेंबर २००७ या महीन्यात अर्जदाराचे मीटर बदलण्यात आल्याची नोंद घेण्यात येवुन त्यांना मागील रिडींग ०१ व चालु रिडींग २७२ तसेच जुन्यामिटरवरील वीज वापर ३४४४२ मिळुन एकुण ३४७१३ युनिट वीज वापराचे वीज बिल देण्यात आले. पण त्यांनतरची सर्व वीज बिले हे मीटरवरील नोंदीप्रमाणे असल्याचे दिसुन येते व या बिलात थकबाकी तसेच व्याज इत्यादी रक्कमेचा समावेश केलेला आढळुन येतो. अर्जदाराने दाखल केलेली तक्रार ही त्यांना सप्टेबर २००७ ते डिसेबर २००७ या काळातील आकारण्यात आलेल्या वीज वापराबाबत असल्याचे दिसुन येते.अर्जदाराने तक्रारीसोबत या चुकीच्या

वीज बिलाबाबत महावितरण कंपनीस सतत केलेल्या तक्रारीच्या प्रति पोच पावतीसह मंचात दाखल केल्या आहेत.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवर उपकार्यकारी अभियंता यांनी वीज बिल दुरूस्ती प्रस्तावात मिटरवरील रिडींग ही ४७८४ पासुन ३९९४२ अशी जम्पं झालेली असल्याचे म्हटले आहे. मुख्य अभियंता यांनी उपकार्यकारी अभियंता यांचा प्रस्ताव फेटाळत त्यांना वरील काळाचे वीज बिल हे ॲक्युमिलेटेड असल्याचे सांगत ते विभागुन देण्यास मंजुरी दिली आहे. मंचाने अर्जदाराचा जुन्या मिटरवरील तसेच नवीन मीटरवरील वापर, स्थळपाहणी अहवाल, मीटर बदली अहवाल इत्यादी कागदपत्राची सखोल पाहणी केल्यावर खालील बाबी स्पष्ट होतात.

अ) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास ऑगस्ट २००७ पर्यत मीटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात येत होते. अर्जदाराचा ऑगस्ट २००७ या आधीच्या गेल्या १२ महीन्याचा अर्जदाराचा सरासरी वीज वापर ३४५ युनिट प्रतिमाह असा असल्याचे दिसुन येते.

ब) अर्जदाराचे जुने मीटर (क्रमांक ६०७८९) हे १३/११/२००७ रोजी बदलण्यात आले त्याजागी १७७६४० क्रमांकाचे मीटर बसविण्यात आले. डिसेबर २००७ ते सप्टेबर २००८ याकाळातील अर्जदाराचा सरासरी वीज वापर ३६९ युनिट प्रतिमाह असल्याचे आढळुन येते.यावरून सप्टेबर २००७ ते नोव्हेबर २००७ या तीन महीन्याचा काळात अर्जदाराचा मीटरवर नोंदविण्यात आलेला वीज वापर हा (३९२२६-४७८४) ३४४४२ युनिट म्हणजेच सरासरी ११४८० युनिट प्रतीमाह असल्याचे महावितरण कंपनीचे म्हणणे चुकीचे असल्याचे स्पष्ट होते. सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या इथे बसविण्यात आलेले मीटर हे इलोक्ट्रॉनीक (Electronic) असल्याचे तसेच या प्रकारच्या मीटरवरील रिडींग मध्ये अचानक वाढ होणे, किंवा रिडींग न दिसणे हे प्रकार क्वचीत प्रमाणात होत असल्याचे नोडल अधिकारी यांनी सांगितले.दिनांक ०६/११/२००८ रोजी महावितरण कंपनीतर्फे अर्जदाराच्या मीटरची स्थळपाहणी करण्यात आली व त्यात अर्जदाराने जोडलेल्या एकुण वीजभाराची नोंद (७.६ केडब्यु) अशी करण्यात आलेली आहे.यात ३००० वॅटचा एक हीटर व १२०० वॅटचा एक ए.सी.असल्याचे नमुद केले आहे.अर्जदाराने हा जोडलेला एकुण वीज भार (७.६केडब्यु) हा २४ तास व ३० दिवस जरी वापरला तरी

वरीलप्रमाणे  ११४८० युनिट प्रतिमाह अशी सरासरी येणे शक्य नाही. या तांत्रीक मुद्यावरून ही नोडल अधिकारी यांचे म्हणणे  मंच मान्य करीत नाही. अर्जदारास डिसेबर २००७ मध्ये आकारण्यात आलेले ३४४४२ युनिट हे ॲक्युमिलीटेड असल्याचा कोणताही पुरावा महावितरण कंपनीतर्फे मंचात दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे मंच त्यास मान्यता देत नाही.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर  सप्टेबर २००७ ते नोव्हेबर २००७ या काळातील अर्जदाराचा वीज वापर हा त्याच्या जुन्या वीज वापराच्या सरासरीवर आधारीत आकारणी करणे योग्य ठरेल असेच मंचाचे मत आहे.

## आदेश

१)	महावितरण कपनीतर्फे अर्जदारास सप्टेबर २००७ नंतर देण्यात आलेली सर्व वीज बिल रद्द करण्यात येत आहेत.

२)	महावितरण कंपनीने अर्जदारास सप्टेबर २००७ ते नोव्हेबर २००७ या काळासाठी सरासरी ३४५ युनिट प्रतिमाह अशी वीज आकारणी करून ३० दिवसाच्या आत अर्जदारास सुधारीत बिल द्यावे.

३)	वरील प्रमाणे सुधारीत बिल देतांना त्यात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

४)	अर्जदाराने वरील काळात भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलात करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४३/२००८/६४** **दिनांक ;-**

**प्रति,**
**सौ. सुवर्णा सुनील राका,**
**१८७,गुडफेलोज रेसीडेंसी,समर्थनगर**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१४३/२००८/६४ )

आपण दिनांक १४/१०/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

No.CGRF/AZ/AUR/U/143/2008/64 Date:-

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**AURANGABAD.**

**(Case No: CGRF/AZ/AUR/U/143/2008/64 )**

**Sub:- Consumer letter dt.01.01.09**
**Ref: Forum's order dt.14.1.1.2008**

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the letter received from Smt.SwarnaSunilkumarRaka,187,Goodfellows Residency, Samarthnagar, Aurangabad regarding issue of incorrect bill .

Please note that Forum has already passed an order in this case. However for any clarification you may attend Forums's office on 6.01.2009 at 11-00 hrs.

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL,**
**Aurangabad.**

**Copy to:-**
**01) The Dy.,Executive Engineer,**
**Power House Sub-Division, MSEDCL,**
**Aurangabad.**
**02 Smt. Swarna Sunilkumar Raka,**
**187, Goodfellows Residency,**
**Samarthnagar,Aurangabad**